(बारा) “ संचालक ” याचा अर्थ, व्यवस्थापन मंडळाकडून तसे संबोधण्यात आलेला, विद्यापीठाचे केंद्र किंवा प्रशाला यांसह त्या परिसंस्थेचा प्रमुख किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेचा प्रमुख, असा आहे ;

(तेरा) “ आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक ” याचा अर्थ, राज्य शासनाने वेळोवेळी अधिसूचित केलेला कोणताही आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, असा आहे ;

(चौदा) “ शुल्क ” याचा अर्थ, विद्यापीठाने आणि त्याच्या उप-केंद्रांनी गोळा करावयाचे, विकास आकारांसह शिकवणी शुल्क, इतर शुल्क व आकार, असा आहे ;

(पंधरा) “ विद्यापीठ विभागाचा प्रमुख ” किंवा “ विद्यापीठ केंद्राचा प्रमुख ” याचा अर्थ, अनुक्रमे विद्यापीठ विभागाचा प्रमुख किंवा विद्यापीठ केंद्राचा प्रमुख, असा आहे ;

(सोळा) “ उच्च शिक्षण ” याचा अर्थ, उच्च माध्यमिक शालेय शिक्षणाच्या टप्प्यावरील किंवा त्याच्या समतुल्य स्तरावरील शिक्षणानंतरचा ज्ञानाचा व्यासंग, असा आहे ;

(सतरा) “ वसतिगृह ” याचा अर्थ, विद्यापीठाने तरतूद केलेले, स्थापन केलेले, चालविलेले, विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांसाठी असलेले निवासस्थान, असा आहे ;

(अठरा) “ आंतर-ज्ञानशाखीय अभ्यास ” याचा अर्थ, परिनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे विविध ज्ञानशाखांमधील संयुक्त शैक्षणिक अभ्यास व संशोधन, असा आहे ;

(एकोणीस) “ ज्ञान संसाधन केंद्र ” याचा अर्थ, शिक्षण, संशोधन, विस्तार सेवा यांसाठी किंवा तत्सम प्रयोजनांसाठी उपयुक्त असलेले मुद्रित, इलेक्ट्रॉनिक व दृक्-श्राव्य स्वरूपातील साहित्य, प्रबंधिका, संदर्भ ग्रंथ, पाठ्यपुस्तके व समीक्षा ग्रंथ, सर्व प्रकारच्या संशोधन पत्रिका (जर्नल्स) आणि कोणत्याही स्वरूपातील इतर कोणतेही साहित्य ठेवण्यासाठी, विद्यापीठाच्या परिसरामध्ये किंवा उप-केंद्रांमध्ये विद्यापीठाने स्थापन केलेले ग्रंथालय, असा आहे ;

(वीस) “ बहु-ज्ञानशाखीय अभ्यास ” याचा अर्थ, परिनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे, एखाद्या विशिष्ट ज्ञानशाखेच्या विविध शाखांमधील संयुक्त शैक्षणिक अभ्यासक्रम व संशोधन अध्ययनक्रम, असा आहे ;

(एकवीस) “ भटक्या जमाती ” याचा अर्थ, आपल्या चरितार्थाच्या शोधात एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी भटकंती करणा-या जमाती म्हणून राज्य शासनाने वेळोवेळी घोषित केलेल्या जमाती, असा आहे ;

(बावीस) “ दीर्घ सुटी नसलेला विद्याविषयक कर्मचारीवर्ग ” याचा अर्थ, राज्य शासन, दीर्घ सुटी नसलेला विद्याविषयक कर्मचारीवर्ग म्हणून वर्गीकृत करील असा कर्मचारीवर्ग, असा आहे आणि त्यामध्ये, जो विद्याविषयक कर्मचारीवर्गास पूरक आहे अशा सर्व कर्मचारीवर्गाचा समावेश होईल, परंतु केवळ प्रशासकीय कामे करणा-या कर्मचारीवर्गाचा त्यात समावेश होणार नाही ;

(तेवीस) “ इतर मागास वर्ग ” याचा अर्थ, राज्य शासनाने नागरिकांचा सामाजिकदृष्ट्या व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्ग म्हणून घोषित केलेला कोणताही वर्ग, असा आहे आणि त्यामध्ये भारत सरकारने महाराष्ट्र राज्याच्या संबंधात वेळोवेळी घोषित केलेल्या इतर मागास वर्गांचा अंतर्भाव होतो ;

(चोवीस) “ विहित ” याचा अर्थ, या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली केलेल्या परिनियमांद्वारे किंवा आदेशाद्वारे किंवा, यथास्थिति, विनियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(दोन) उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा सचिव किंवा राज्य शासनाने नामनिर्देशित केलेला शासनाच्या सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला कोणताही अधिकारी ;

(तीन) व्यवस्थापन मंडळाने आणि विद्यापरिषदेने संयुक्तपणे नामनिर्देशित केलेला, मराठी भाषा व साहित्य यांचे जतन व संवर्धनासाठी काम करणा-या राष्ट्रीय लौकिकप्राप्त परिसंस्थेचा किंवा संघटनेचा संचालक किंवा प्रमुख ;

(चार) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अध्यक्षाने नामनिर्देशित केलेला सदस्य ;

(ख) खंड (क) च्या उप-खंड (एक) अन्वये कुलपतीने नामनिर्देशित केलेला सदस्य हा, समितीचा अध्यक्ष असेल ;

(ग) समितीवर नामनिर्देशित केलेले सदस्य हे, ज्या व्यक्ती विद्यापीठाशी अथवा त्या विद्यापीठाच्या कोणत्याही महाविद्यालयाशी किंवा कोणत्याही मान्यताप्राप्त परिसंस्थेशी कोणत्याही रीतीने संबंधित नसतील अशा व्यक्ती असतील ;

(घ) समितीचे सर्व सदस्य उपस्थित असल्याशिवाय, समितीची कोणतीही बैठक घेण्यात येणार नाही ;

(ङ) समिती, कुलगुरू म्हणून नियुक्ती केली जाण्यासाठी कुलपतीच्या विचारार्थ पाचपेक्षा कमी नसतील इतक्या सुयोग्य व्यक्तींच्या नामिकेची शिफारस करील. अशा प्रकारे शिफारस केलेल्या व्यक्तींची नावे, कोणताही पसंतीक्रम न दर्शविता वर्णानुक्रमानुसार नमूद केलेली असतील. समिती, नामिकेत समाविष्ट असलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या सुयोग्यतेच्या सविस्तर माहितीसह अहवाल तयार करील आणि तो कुलपतीला सादर करील ;

(च) कुलगुरू म्हणून नियुक्तीकरिता, समितीने शिफारस केलेली व्यक्ती,—

(एक) सर्वोच्च पातळीची सक्षमता, सचोटी, नैतिकता व परिसंस्थात्मक बांधिलकी असलेली व्यक्ती असेल ;

(दोन) विद्याविषयक नेतृत्व सिद्ध केलेले असल्याच्या पुराव्यासह, विद्यापीठामध्ये प्राध्यापक म्हणून किमान दहा वर्षांचा अनुभव असलेली मराठी भाषा व साहित्य या क्षेत्रातील अथवा मराठी भाषा व साहित्य या क्षेत्रातील लौकिकप्राप्त संशोधन किंवा शैक्षणिक प्रशासकीय संघटनेमधील दहा वर्षांचा अनुभव असलेली, एक विख्यात शिक्षणतज्ज्ञ असेल ;

(तीन) तिच्या स्वतःच्या आदर्शातून नेतृत्व करण्यास सक्षम असेल ;

(चार) दूरदृष्टी देण्यास सक्षम असेल ; आणि विद्यार्थी व समाज यांच्या हिताच्या दृष्टीने, ती वास्तवात आणण्याची क्षमता तिच्यात असेल ; आणि

(पाच) कुलपतीशी विचारविनिमय करून, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे राज्य शासनाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी, अतिरिक्त शैक्षणिक अर्हता व अनुभव तिने धारण केलेला असेल :

परंतु, शैक्षणिक अर्हता व अनुभव, विद्यापीठ अनुदान आयोगाने किंवा यथास्थिति, इतर कोणत्याही नियामक प्राधिकरणाने विहित केलेल्या मानकांशी सुसंगत असेल ;

(छ) कुलगुरू म्हणून नियुक्ती करण्याच्या पात्रतेच्या शर्ती आणि नावांची शिफारस करण्याची प्रक्रिया यांस, अधिक सुयोग्य उमेदवारांची शिफारस करण्याची सुनिश्चिती करण्यासाठी व्यापक प्रसिद्धी देण्यात येईल.

(४) कुलपतीस, नामिकेमध्ये समाविष्ट असलेल्या व्यक्तींपैकी समितीने शिफारस केलेल्या एका व्यक्तीची, कुलगुरू म्हणून नियुक्ती करता येईल :

परंतु, जर कुलपतीने निवड केलेल्या व्यक्तीने, कुलगुरु पदाचा पदभार स्वीकारला नाही तर, कुलपती

(छ) विद्याविषयक बाबींशी संबंधित असणा-या आदेशांचा मसुदा व्यवस्थापन मंडळाकडे प्रस्तावित करणे ;

(ज) विद्याविषयक बाबींच्या संबंधातील आदेश व विनियम करणे, त्यात सुधारणा करणे व त्यांचे निरसन करणे ;

(झ) प्राश्निक, परीक्षक, नियामक आणि परीक्षा घेण्याच्या व मूल्यमापन करण्याच्या कामाशी संबंधित असणा-या इतर व्यक्ती यांच्या नियुक्तीसाठी अर्हता व प्रमाणके विहित करणे ;

(ञ) विद्यापीठ निधीमधून व निधी पुरवठा करणा-या इतर अभिकरणांकडून (राज्य शासन वगळून) मिळालेल्या निधीमधून विद्यापीठास आवश्यक असलेल्या विद्यापीठ अध्यापकांची व दीर्घ सुटी नसलेल्या विद्याविषयक कर्मचारीवर्गाची पदे निर्माण करण्याबाबत विचार करणे व त्याबाबत व्यवस्थापन मंडळाला शिफारस करणे आणि त्यांची अर्हता, अनुभव व वेतनश्रेणी विहित करणे ;

(ट) विद्यापरिषदेने तयार केलेल्या सर्वसमावेशक यथार्थदर्शक आराखड्याची व्यवस्थापन मंडळाला शिफारस करणे ;

(ठ) त्यांच्याकडे विचारार्थ पाठवलेले नवीन पाठ्यक्रम, आंतर-ज्ञानशाखीय पाठ्यक्रम व अल्पमुदती प्रशिक्षण कार्यक्रम यांना मान्यता देणे ;

(ड) संबंधित प्रशालेने शिफारस केलेले पाठ्यक्रम, क्रमिक अभ्यासक्रम, प्राश्निक, परीक्षक व नियामक आणि विविध पाठ्यक्रमांच्या मूल्यमापन योजना यांना मान्यता देणे ;

(ढ) प्रमुख व (बहुविध) गौण पदवी अभ्यासक्रमांना मान्यता देणे ;

(ण) सर्व विद्याविषयक बाबींच्या संबंधात विद्यापीठाला सल्ला देणे आणि विद्याविषयक अध्ययनक्रमांबाबत व्यवस्थापन मंडळाला सुसाध्यता अहवाल सादर करणे ;

(त) सर्व विद्याविषयक अध्ययनक्रमांकरिता पसंती-आधारित श्रेयांक पद्धतीसाठी धोरण, कार्यपद्धती व कार्यप्रथा निर्माण करणे ;

(थ) देशातील विविध विद्यापीठांमधील विद्यार्थ्यांच्या गतिशीलतेबाबतचे धोरण तयार करणे, आणि विद्यापीठातील किंवा अन्य विद्यापीठांतील, विविध विभाग, प्रशाला, केंद्रे यांमधून विविध पाठ्यक्रम घटक निवडण्यास व त्याचे अध्ययन करण्यास लवचिकता देण्याबाबतचे धोरण देखील निर्धारित करणे ;

(द) पदवी शिक्षण व इतर विद्याविषयक अध्ययनक्रम पूर्ण करण्यासाठी किमान व कमाल कालावधी असलेल्या शिक्षणाबाबतचा व " अनुकूल अध्ययनगती " बाबतचा अधिक लवचिक दृष्टिकोन रुजविण्यासाठी कार्यपद्धती, धोरणे व कार्यप्रथा याबाबत तपशीलवार योजना तयार करणे ;

(ध) एखादे पदवी शिक्षण व इतर विद्याविषयक अध्ययनक्रम पूर्ण करण्यासाठी किमान व कमाल कालावधी असलेल्या शिक्षणाबाबतचा व " अनुकूल अध्ययनगती " बाबतचा अधिकाधिक लवचिक दृष्टिकोन रुजविणे ;

(न) संशोधन प्रकल्प हे, पदव्युत्तर अध्ययनक्रमांच्या पसंतीआधारित प्रतिमानाचा एक अविभाज्य भाग असल्याची सुनिश्चिती करणे ;

(प) विद्यमान शैक्षणिक वर्ष संपण्याच्या तीन महिने अगोदर, नियामक प्राधिकरणांच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, पुढील शैक्षणिक वर्षाकरिता विद्यापीठाचे शैक्षणिक वेळापत्रक तयार करणे ;

नियोजन व विकास मंडळाचे अधिकार व कर्तव्ये.

**२६.** नियोजन व विकास मंडळ पुढील अधिकारांचा वापर करील आणि पुढील कर्तव्ये पार पाडील :—

(१) विद्यापीठाच्या उद्दिष्टांचा विचार करून शिक्षणातील व्यापक विकास अध्ययनक्रमांची व्यवस्थापन मंडळाला शिफारस करणे ;

(२) विद्यापीठातील अध्ययन, शिक्षण, संशोधन, प्रशिक्षण व परीक्षा यांमधील दर्जा राखण्याबाबत पुनर्विलोकन करणे ;

(३) विद्यापीठांची शैक्षणिक कामगिरी व गरजा यांचे मूल्यनिर्धारण करण्याच्या दृष्टीने, विद्यापीठाच्या विभागांचे व केंद्रांचे निरीक्षण करण्याची व्यवस्था करणे ;

(४) विद्यापीठाच्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी आवश्यक वाटेल अशा कोणत्याही बाबीवर व्यवस्थापन मंडळास आणि विद्यापरिषदेला सल्ला देणे ;

(५) अधिनियमात निर्धारित केलेली विद्यापीठाची उद्दिष्टे विचारात घेऊन आणि राज्य व राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा योग्य विचार करून, अल्प मुदतीचे व दीर्घ मुदतीचे, अशा दोन्ही प्रकारचे, विद्यापीठ यथार्थदर्शी विकास आराखडे तयार करणे आणि ते, मान्यतेसाठी व्यवस्थापन मंडळाला सादर करणे ;

(६) विद्यापीठाचे विभाग व केंद्रे यांच्या विकास व सहयोगी अध्ययनक्रमांची व्यवस्थापन मंडळाला, शिफारस करणे ;

(७) मान्य केलेल्या अशा सर्व विकास व सहयोगी अध्ययनक्रमांचे संनियंत्रण करणे आणि त्यांच्या प्रगतीचा अहवाल व्यवस्थापन मंडळाला पाठविणे ;

(८) विकास प्रकल्पांच्या बाबतीत विद्यापीठ विभागांनी व केंद्रानी केलेल्या अनुदानाच्या वापराचे मूल्यमापन व मूल्यनिर्धारण करणे आणि त्याचा अहवाल विद्यापरिषदेला पाठवणे ;

(९) वाणिज्य, उद्योग, समाजसेवा, विज्ञान व तंत्रज्ञान यांसारख्या विविध क्षेत्रातील प्रशिक्षित व्यक्तींच्या मुनष्यबळाच्या गरजांचे मूल्यनिर्धारण करणे आणि संबंधित अभ्यासपाठ्यक्रम सुरू करण्यासाठी आणि त्याचे सक्षमीकरण करण्यासाठी विद्यापरिषदेला आवश्यक शिफारशी करणे ;

(१०) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या किंवा राष्ट्रीय मूल्यनिर्धारण व अधिस्वीकृती परिषदेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, विद्यापीठाच्या विकास व सहयोगी अध्ययनक्रमांचे, तीन वर्षांतून किमान एकदा किंवा आवश्यक वाटल्यास, त्यापूर्वी, शैक्षणिक परिनिरीक्षण करणे आणि ते अंमलात आणण्यासाठी विद्यापीठाला आवश्यक शिफारशी करणे ;

(११) शिक्षणाचे व संवादाचे माध्यम म्हणून मराठीला प्रोत्साहन देणे ;

(१२) पदवीपूर्व व पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी अभ्यास साहित्य म्हणून मुद्रित व इलेक्ट्रॉनिक स्वरुपात पाठ्यपुस्तके तयार करणे ;

(१३) विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक अभिजात साहित्य कृतींचा, विशेषतः, इंग्रजीमधून व इतर आधुनिक भाषांमधून मराठीमध्ये मुद्रित व इलेक्ट्रॉनिक स्वरुपात अनुवाद करणे ;

(१४) समोद्देशी संघ म्हणून इतर विद्यापीठांच्या व महाविद्यालयांच्या सहयोगाने विविध विषयांतील इंग्रजी पुस्तकांचा अनुवाद करणे ;

(१५) मराठी भाषा व मराठी साहित्य समृद्ध करण्यासाठी आणि त्याचा प्रसार करण्यासाठी माहिती व संदेशवहन तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात वापर करणे ;

(१६) इतर भाषांशी निगडीत असलेल्या सांस्कृतिक व भाषिक संबंधात मराठीमध्ये प्रगत संशोधन करणे, आंतर-सांस्कृतिक संबंध विचारात घेऊन, इतर भाषांमधील साहित्यकृतींचा मराठीत अनुवाद करणे ;

(१७) मराठीमध्ये वैचारिक, समीक्षणात्मक, सर्जनशील व सैद्धांतिक विचारांना प्रोत्साहन देणे ;

(१८) मराठीमध्ये व्यावसायिक व उपयोजित स्वरूपाचे पाठ्यक्रम तयार करणे आणि ते उपलब्ध करून देणे ;

(१९) विविध प्रदेशांतील मराठी भाषेच्या विभिन्नतेचे संशोधन करणे ;

(२०) मराठीमध्ये अहवाल, प्रबंधिका, पुस्तके, संशोधन खंड प्रसिद्ध करण्याची सुविधा करणे ;

(२१) हा अधिनियम, परिनियम, अध्यादेश व विनियम यांद्वारे किंवा त्याअन्वये प्रदान करण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करणे आणि सोपविण्यात येतील अशी इतर कर्तव्ये पार पाडणे.

**२७.** विद्यापीठाच्या अभ्यास प्रशाला पुढीलप्रमाणे असतील :— अभ्यास प्रशाला.

(१) भाषाशास्त्र व भाषा अभियांत्रिकी प्रशाला :— या प्रशालेत, पुढील विद्यापीठ विभाग व केंद्रे यांचा समावेश असेल :—

(एक) भाषा व लिपीशास्त्र विभाग :— हा विभाग, पुढील विषय, शाखा व विद्याशाखा यांमधील शिक्षण, विस्तार, अध्यापन, अध्ययन व प्रशिक्षण देईल :—

(क) भाषेचे तत्वज्ञान, भाषा नियोजन, भाषा कुलाची संकल्पना;

(ख) ऐतिहासिक, वर्णनात्मक व तौलनिक भाषाशास्त्र;

(ग) लिपीशास्त्र व मराठी भाषेतील विविध लिपींचा, म्हणजेच, मोडी, महानुभाव, ब्रेल, सांकेतिक भाषा (अर्गोट), इत्यादींचा अभ्यास ;

(घ) शिलालेख, ताम्रपट, नाणी, ऐतिहासिक कागदपत्रे, जुनी हस्तलिखिते यांवरील चिन्हांचा, कोरीव लेखांच्या संकेतांचा किंवा शिला वर्णनाचा व लिपींचा अभ्यास करणे आणि मराठीमध्ये सचित्र व वर्णनात्मक शब्दकोशांची निर्मिती करणे ;

(ङ) मराठी साहित्यातील मिथकांचा अभ्यास.

(दोन) भाषा अभियांत्रिकी व संगणकीय भाषाशास्त्र विभाग :— हा विभाग, पुढील विषय, शाखा व विद्याशाखा यांमधील शिक्षण, विस्तार, अध्यापन, अध्ययन व प्रशिक्षण देईल :—

(क) माहिती निष्कर्षण व मजकुर मंथन;

(ख) संभाषणातील वाक्यबंधाचे रसप्रधान विश्लेषण;

(ग) यांत्रिक अनुवाद;

(घ) नैसर्गिक भाषेतील आंतरसंवाद;

(ड.) मराठीतील उच्चारानुसारी संगणक आज्ञावली (सॉफ्टवेअर), लेखन दुरुस्ती कळफलक;

(च) अवतरण बहुपद्धती वाचक, वाङमयचौर्य शोधक, सुगम वाचन क्षमता वाचक किंवा यंत्र यांचा विकास;

(छ) भाषा संपादन संगणक आज्ञावली (सॉफ्टवेअर), ऑनलाईन संभाषण संगणकीकृत आज्ञावली (चॅट बॉट), संदेश फलक, कृत्रिम बुद्धिमत्ता (ए आय) साधने, प्रतिमा वर्गीकरण, भाषण प्रतिलेखन संगणक आज्ञावली, इत्यादींसारख्या अध्यापन साधनांचा विकास;

(ज) संगणक भाषा, अभिरूप खेळ, इत्यादींचे अध्यापन;

(झ) अध्यापन व संशोधन कार्यक्रमांसाठी भाषा प्रयोगशाळेचा वापर.

(तीन) मानस-बोधात्मक व चेता-भाषाशास्त्र विभाग :— हा विभाग, पुढील विषय, शाखा व विद्याशाखा यांमधील शिक्षण, विस्तार, अध्यापन, अध्ययन व प्रशिक्षण देईल :—

(क) भाषण, वाचा उपचारपद्धती व उपचारात्मक भाषाशास्त्र यांचे आकलन;

(ख) कार्यिक उच्चारणदोष व श्रवणलोप यांचा अभ्यास;

(ग) लवकर वाचण्याच्या क्षमता, शाळापूर्व साक्षरता, उच्चार शास्त्रविषयक जाणीव, सांकेतिक (अशाब्दिक) बुद्धिमत्ता, इत्यादींच्या चाचण्या.

(चार) समाज-भाषाविज्ञान व बोलीविज्ञान विभाग :— हा विभाग, पुढील विषय, शाखा व विद्याशाखा यांमधील शिक्षण, विस्तार, अध्यापन, अध्ययन व प्रशिक्षण देईल :—

(क) समाज-भाषा विज्ञान सिद्धांत, भौगोलिक बोली विज्ञान, बोलींचे सर्वेक्षण, बोलींचा अभ्यास आणि व्याकरण व शब्दकोश तयार करणे ;

(ख) बोलींचे भाषाशास्त्रीय संपादन व जतन; सांकेतिक (अर्गोट) बोलींचा अभ्यास;

(ग) बोली, आदिवासी भाषा व प्रमाण मराठी यामधील अंतर कमी करणे.

(पाच) भाषा अध्यापन, प्रशिक्षण व संशोधन विभाग :— हा विभाग, पुढील विषय, शाखा व विद्याशाखा यांमधील शिक्षण, विस्तार, अध्यापन, अध्ययन व प्रशिक्षण देईल :—

(क) भाषेतील अध्यापन, प्रशिक्षण व संशोधन ; थेट पद्धती, व्याकरण अनुवाद, मौखिक क्षमता विकसित करणे, शब्दसंग्रह वाढविणे यासारख्या अध्ययन-अध्यापन पद्धती;

(ख) संप्रेषणात्मक भाषा अध्यापन, भाषा अध्यापनशास्त्र;

(ग) कार्याधिष्ठीत भाषा शिक्षण, इत्यादी.

(सहा) भारतीय व विदेशी भाषा आणि अनुवाद अभ्यास विभाग :— हा विभाग, पुढील विषय, शाखा व विद्याशाखा यांमधील शिक्षण, विस्तार, अध्यापन, अध्ययन व प्रशिक्षण देईल :—

(क) भारतीय भाषांचे अध्यापन–आंतरभारती प्रकल्प (गुजराती, कन्नड, तेलगू, मल्याळी, बंगाली, सिंधी, पंजाबी, इत्यादी);

(ख) विदेशी भाषांचे अध्यापन–विश्व भारती प्रकल्प (इंग्रजी, फ्रेंच, जपानी, अरेबिक, इत्यादी);

(ग) अनुवाद अभ्यास (अनुवाद अभ्यास व दूभाषण सेवा अकादमी).

(सात) कोश-रचनाशास्त्र विभाग :— हा विभाग, पुढील विषय, शाखा व विद्याशाखा यांमधील शिक्षण, विस्तार, अध्यापन, अध्ययन व प्रशिक्षण देईल :—

(क) भारताच्या भाषा धोरणानुसार, प्रशासन, शिक्षण, न्यायालये, विधिमंडळ, जनसंवाद, इत्यादींमध्ये भाषांचा वापर;

(ख) विविध क्षेत्रांतील मराठी परिभाषेमधील शब्दकोशांचा विकास;

(ग) कोशरचनाशास्त्राचे अध्यापन व संशोधन अध्ययनक्रम, शब्दकोशाच्या घटकांचे व संरचनांचे सिद्धांत, विदा (डेटा) संघटन, इत्यादी;

(घ) वीजकीय (इलेक्ट्रॉनिक) शब्दकोश, हायपरटेक्स्ट लेखन, इत्यादी तयार करणे.

(२) कला व साहित्य प्रशाला :— या प्रशालेत, पुढील विद्यापीठ विभाग व केंद्रे यांचा समावेश असेल :—

(एक) ललित कला, प्रयोगनिष्ठ कला, उपयोजित कला व हस्तकला विभाग :– हा विभाग, पुढील विषय, शाखा व विद्याशाखा यांमधील शिक्षण, विस्तार, अध्यापन, अध्ययन व प्रशिक्षण देईल:–

(क) ललित कला, प्रयोगनिष्ठ कला, उपयोजित कला, सुलेखन;

(ख) भौतिक वस्तूंचे संकल्पन व सजावट, फॅशन डिझायनिंग, इत्यादी (सिरेमिक कला व शिल्पकला, फर्निचर संकल्पन);

(ग) औद्योगिक संकल्पन, वास्तुशास्त्र, अंतर्गत संकल्पन, ग्राफिक संकल्पन;

(घ) संगीत, नृत्य, नाटक, इत्यादींमधील सादरीकरणासाठी ‘‘कलाभवन’’.

(दोन) अभिजात भाषा व मध्ययुगीन मराठी वाङमय विभाग :- हा विभाग, पुढील विषय, शाखा व विद्याशाखा यांमधील शिक्षण, विस्तार, अध्यापन, अध्ययन व प्रशिक्षण देईल:—

(क) संस्कृत, प्राकृत, पाली, फारसी, दखनी यांसारख्या अभिजात भाषांचा व साहित्याचा अभ्यास;

(ख) महानुभाव, वारकरी, जैन, सुफी, वीरशैव, बौद्ध, नाथ किंवा शाक्त पंथ, पंडित व बखर साहित्य, इत्यादींचे सामाजिक व साहित्यिक योगदान;

(ग) आधुनिक व समकालीन मराठी साहित्याचा अभ्यास, प्रभाव अभ्यास, साहित्यातील विविध प्रवाह व चळवळी.

(तीन) तत्त्वज्ञान, प्राचीन व पाश्चात्य सौंदर्यमीमांसा, शैलीशास्त्र व अर्थनिरूपणशास्त्र (हर्मेन्युटिक्स) विभाग :— हा विभाग, पुढील विषय, शाखा व विद्याशाखा यांमधील शिक्षण, विस्तार, अध्यापन, अध्ययन व प्रशिक्षण देईल :—

(क) भारतीय व पाश्चात्य तत्वज्ञान;

(ख) सौंदर्यमीमांसा व काव्यशास्त्र (प्राचीन व पाश्चात्य);

(ग) शैलीशास्त्र व व्यावहारिक समीक्षा;

(घ) मराठी काव्यशास्त्राचा व समीक्षेचा इतिहास;

(ङ) मराठीतील तात्विक विचारवंत व साहित्यिक समीक्षक.

(चार) मराठीतील सर्जनशील व व्यावसायिक लेखन विभाग :- हा विभाग, पुढील विषय, शाखा व विद्याशाखा यांमधील शिक्षण, विस्तार, अध्यापन, अध्ययन व प्रशिक्षण देईल :—

(क) बालसाहित्य, कथा-कादंबरी लेखन, नाटक व सायबरपंक लेखन;

(ख) राष्ट्रीय शैक्षणिक धोरणे, २०२० याच्या विशेष संदर्भासह साहित्याच्या माध्यमातून मूल्य शिक्षण;

(ग) सर्जनशील लेखनातील परंपरा व आधुनिकता.

(३) महाराष्ट्रविद्या व समाजशास्त्र प्रशाला :— या प्रशालेत, पुढील विद्यापीठ विभाग व केंद्रे यांचा समावेश असेल :—

(एक) महाराष्ट्रविद्या व सांस्कृतिक अभ्यास विभाग:— हा विभाग, पुढील विषय, शाखा व विद्याशाखा यांमधील शिक्षण, विस्तार, अध्यापन, अध्ययन व प्रशिक्षण देईल :—

(क) भारतविद्या व महाराष्ट्रविद्या संकल्पनात्मक संरचना व पद्धतीशास्त्र;

(ख) महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास (सामाजिक-राजकीय-सांस्कृतिक संस्था, जाती व्यवस्था, ग्रामीण-शहरी समाज, तात्विक विचारप्रणाली व परंपरा, नैसर्गिक संपत्ती व मानव संसाधन, वर्ग-संघर्ष, नैतिक व सौंदर्यात्मक मूल्ये, सामाजिक परिवर्तन, कला, साहित्य, विज्ञान, परंपरा, कृषी, उद्योग, व्यवसाय, सार्वजनिक प्रशासन, मानवाधिकार, सामाजिक सुधारणा);

(ग) प्रादेशिक व उप-सांस्कृतिक अभ्यास (लोककथा, लोक-संस्कृती, लोक साहित्य व कला, उपाश्रयीं (सबाल्टर्न) अभ्यास, अधोलोक (गुन्हेगारी जगतातील) संस्कृती, पारंपारिक लिंगभाव भूमिका, महिलांचे हक्क आणि स्त्रीवादी चळवळी);

(घ) मराठी समाजाचे समकालीन सामाजिक प्रवाह;

(ङ) सायबर-सांस्कृतिक बदल आणि त्याचा महाराष्ट्रावर होणारा परिणाम.

(दोन) बृहन्महाराष्ट्र अभ्यास विभाग :—हा विभाग, पुढील विषय, शाखा व विद्याशाखा यांमधील शिक्षण, विस्तार, अध्यापन, अध्ययन व प्रशिक्षण देईल :—

(क) मराठी प्रांतांचा इतिहास व संस्कृती (महाराष्ट्राबाहेरील तंजावर, बडोदा, ग्वाल्हेर, इत्यादी);

(ख) मराठी प्रांतांतील प्रशासकीय व सामाजिक सुधारणा;

(ग) मराठी प्रांतांतील कला, साहित्य, संस्कृती, भाषा व बोली.

(तीन) समाज विज्ञान विभाग :—हा विभाग, पुढील विषय, शाखा व विद्याशाखा यांमधील शिक्षण, विस्तार, अध्यापन, अध्ययन व प्रशिक्षण देईल :—

(क) इतिहास, मानववंशशास्त्र, मानसशास्त्र व समाजशास्त्र;

(ख) राज्यशास्त्र, लोक प्रशासन, कायदा;

(ग) अर्थशास्त्र, लोकसंख्याशास्त्र अभ्यास;

(घ) भूगोल, नैसर्गिक संसाधने व पर्यावरण.

(४) आंतरविद्याशाखीय अभ्यास प्रशाला :— या प्रशालेत, पुढील विद्यापीठ विभाग व केंद्रे याचा समावेश असेल :—

(एक) पत्रकारिता व जनसंज्ञापन विभागः—हा विभाग, पुढील विषय, शाखा व विद्याशाखा यांमधील शिक्षण, विस्तार, अध्यापन, अध्ययन व प्रशिक्षण देईल :—

(क) जनसंपर्क विज्ञान;

(ख) मुद्रित माध्यमे;

(ग) जनसंपर्क माध्यमे;

(घ) डिजिटल माध्यमे;

(ङ) तार किंवा ऑनलाइन पत्रकारिता;

(च) जाहिरात;

(छ) ॲनिमेशन;

(ज) सायबरपंक;

(झ) इलेक्ट्रॉनिक साधनांनी जोडलेल्या व्यक्तींचा समूह (इलेक्ट्रॉनिक नेबरहूड);

(ञ) प्रसार माध्यम समीक्षा, इत्यादी.

(दोन) वाणिज्य व व्यवस्थापन विभागः—हा विभाग, पुढील विषय, शाखा व विद्याशाखा यांमधील शिक्षण, विस्तार, अध्यापन, अध्ययन व प्रशिक्षण देईल :—

(क) व्यवसाय व विपणन, विमा, कर्जरोखे, भाग भांडवल आणि शेअर बाजार;

(ख) जाहिरात, चिन्हांकन (ब्रँडीग), स्वामित्वाधिकार व व्यावसायिक लेखन आकृतिबंध व पद्धती.

(तीन) ग्रंथालय व माहिती विज्ञान विभाग :—हा विभाग, पुढील विषय, शाखा व विद्याशाखा यांमधील शिक्षण, विस्तार, अध्यापन, अध्ययन व प्रशिक्षण देईल :—

(क) ग्रंथालय व माहिती विज्ञान;

(ख) माहितीचे संघटन, उपलब्धता, माहिती निष्कर्षण पद्धती, माहितीचे संकलन व नियमन, माहिती स्रोतांचा प्रसार;

(ग) दस्तऐवजीकरण शास्त्र;

(घ) ग्रंथालयाचा इतिहास व पुरातत्वशास्त्र;

(ङ) वर्गीकरण पध्दती व अभिलेख व्यवस्थापन;

(च) निर्देशांकन व संदर्भ सेवा.

शैक्षणिक सेवा केंद्रे.

**२८.** विद्यापीठ, पुढील शैक्षणिक सेवा केंद्रे स्थापन करील :—

(१) ज्ञान संसाधन, अनुवाद व दुभाषण सेवा केंद्र :—हे केंद्र, या व इतर विद्यापीठांना मूलभूत अध्ययन साहित्य आणि संदर्भ पुस्तके, इत्यादींचा अनुवाद आणि मराठीतील अन्य कोणत्याही अनुवाद व दुभाषण विषयक आवश्यक सेवा, अभ्यासक्रम तयार करणे, प्रश्न पेढी, सर्जनशील व नवसंशोधन पद्धती आणि परस्पर सहयोगदायक ज्ञान निर्मिती यांमधील प्रशिक्षण कार्यक्रम पुरवील.

(२) दृक्-श्राव्य (ए. व्ही.) आणि संगणकीय साहित्य निर्मिती केंद्र :—हे केंद्र, पुढील गोष्टी पुरवील :—

(क) दृक्-श्राव्य (ए. व्ही.) कलागृहाच्या माध्यमातून, ऑनलाइन अध्यापन-अध्ययन कार्यक्रमांबाबतची विद्यापीठाची संकल्पना;

(ख) दृक्-श्राव्य (ए. व्ही.) अध्यापन-अध्ययन साहित्याची निर्मिती करणे आणि ज्ञान प्रक्षेपण वाहिन्यांच्या मार्फत विविध क्षेत्रातील तज्ञांच्या पाठांचे प्रसारण व प्रक्षेपण करणे;

(३) मराठी भाषा, मराठी साहित्य व संस्कृती यांस प्रोत्साहन देण्याचे आंतरराष्ट्रीय केंद्र :—हे केंद्र, पुढील गोष्टी पुरवील :—

(क) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती यांस प्रोत्साहन देण्यासाठी विदेशी विद्यापीठे व मराठी भाषा संघटना यांच्या सहयोगाने अध्ययनक्रम सुरु करणे;

(ख) सांस्कृतिक आदान-प्रदान कार्यक्रम, परस्पर सहयोगी संशोधन उपक्रम, इत्यादी.

(४) ग्रंथालय व माहिती केंद्र :—हे केंद्र, पुढील गोष्टी पुरवील :—

(क) विद्यार्थ्यांना व अध्यापकांना, संदर्भ पुस्तके व संदर्भ सेवा यांमार्फत विचार, संकल्पना यांचा अभिलेख उपलब्ध करून देण्याची सेवा;

(ख) संदर्भ ग्रंथ, डिजिटल पुस्तके व नियतकालिके यांचा संग्रह;

(ग) चित्रपट, छायाचित्रे आणि इतर पुस्तकेतर साहित्य, वृत्तपत्रे, भित्तीपत्रके, ध्वनिमुद्रणफिती, सूक्ष्म चित्रफिती, आलेख, तक्ते, इत्यादींचा संग्रह.

(५) वस्तुसंग्रहालय व पुरातत्त्व केंद्र :—हे केंद्र, पुढील गोष्टी पुरवील :—

(क) मराठी हस्तलिखिते, दुर्मिळ पुस्तके, कीर्तनाच्या दृक्-श्राव्य (ए. व्ही.) फिती, नाट्य प्रयोग, संगीत, मराठी संस्कृती व इतिहास यांच्याशी संबंधित असलेल्या सांस्कृतिक वस्तूंचा लोकप्रिय संग्रह, संगीतवाद्ये, इत्यादींचे वस्तुसंग्रहालय;

(ख) महाराष्ट्राच्या साहित्य व संस्कृतीचा वारसा जतन करणे.

(६) संगणकीय भाषा विषयक प्रयोगशाळा :—हे केंद्र, पुढील गोष्टी पुरवील :—

(क) संभाषण विश्लेषण, संभाषण ओळख, न्यायवैद्यक विश्लेषण याकरिता स्वनीय प्रयोगशाळा;

(ख) भाषा अध्यापन कार्यक्रमासाठी बहु-संभाषण दृक् स्वनिक विद्युत आलेखाचा व संगणक आज्ञावलीचा वापर;

(ग) भाषाशास्त्रातील संशोधनाच्या नवीन आकर्षक क्षेत्रासाठी संभाषण जुळणी (सिन्थेसायझर), यांत्रिक अनुवाद, मजकुरात अतिरिक्त माहिती टाकण्याचे व त्याचे विश्लेषण व अर्थबोधनाचे साधन (कॉर्पस ॲनोटेशन टूल्स), इत्यादी गोष्टीसह यांत्रिक अध्ययन, सखोल अध्ययन, कृत्रिम बुध्दिमत्ता (एआय), इत्यादी सुविधांसाठी संगणकीय भाषिक प्रयोगशाळा.

(७) मनो-भाषाशास्त्रीय प्रयोगशाळा :— मनो-भाषाशास्त्रीय प्रयोगशाळा, जलद वाचन क्षमता चाचणी, ध्वनीशास्त्रीय प्रक्रियेची सर्व समावेशक चाचणी व शाळापूर्व जलद साक्षरता चाचणी, सांकेतिक बुध्दिमत्तेची प्राथमिक चाचणी यांसारख्या विविध भाषिक चाचण्यांसाठी सुविधा पुरवील.

(८) पुस्तक निर्मिती व मुद्रण सेवा केंद्र :—हे केंद्र, पुढील गोष्टी पुरवील :–

(क) मराठीतील विविध संदर्भ ग्रंथांचे प्रकाशान करणे;

(ख) प्रबंध व संशोधन साहित्याचा मराठीत अनुवाद करणे;

(ग) पाठ्यपुस्तके व पूरक वाचन साहित्य व रचनांतरण पाठ यांचे संपादन करणे;

(घ) पाठ संपादन, भाषा संपादन, प्रतीचे संपादन, मुद्रित शोधन, मांडणी संकल्पन, संकल्पचित्रण करणे.

अभ्यास मंडळ.

**२९.** (१) प्रत्येक प्रशालेचे एक अभ्यास मंडळ असेल.

(२) अभ्यास मंडळ हे, विद्यापीठ विभागांमध्ये आणि प्रशालेच्या अधिपत्याखालील केंद्रामध्ये शिकविल्या जाणा-या विषयांच्या किंवा विषयांच्या गटांच्या संबंधातील अभ्यास व संशोधनाच्या बाबतीत प्रत्येक प्रशालेचे प्रमुख शैक्षणिक प्राधिकरण असेल. अभ्यास मंडळ, पुढील सदस्यांचे मिळून बनलेले असेल :—

(क) प्रशालेचा अधिष्ठाता-अध्यक्ष;

(ख) प्रशालेच्या अंतर्गत असलेल्या विभागांचे प्रमुख व केंद्रांचे प्रमुख;

(ग) कुलगुरूने नामनिर्देशित केलेले प्रशालेमधील दोन ते पाच तज्ज्ञ प्राध्यापक;

(घ) विभागाच्या किंवा केंद्रांच्या प्रमुखाव्यतिरिक्त प्रशालेतील अन्य दोन सहयोगी प्राध्यापक व दोन सहायक प्राध्यापक, ज्येष्ठतेनुसार, आळीपाळीने अडीच वर्षांच्या कालावधीसाठी ;

(ङ) प्रशालेला नेमून दिलेल्या कोणत्याही विषयातील किंवा कोणत्याही संलग्न ज्ञान शाखांमधील विशेष ज्ञान असलेल्या विद्यापीठाबाहेरील विद्यापरिषदेने नामनिर्देशित केलेले तीन सदस्य;

(च) प्रशालेच्या अधिष्ठात्याकडून नामनिर्देशित करावयाचा, प्रशालेचा एक सहयोगी प्राध्यापक, सदस्य-सचिव.

अभ्यास मंडळाचे अधिकार व कर्तव्ये.

**३०.** अभ्यास मंडळाचे अधिकार व कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील :—

(१) प्रशालेच्या अंतर्गत असलेले विभाग व केंद्रे यांमधील अध्यापन व संशोधन कार्यामध्ये समन्वय ठेवणे;

(२) प्रशालेच्या अंतर्गत असलेल्या एकापेक्षा अधिक विभागांशी व केंद्रांशी संबंधित असलेल्या किंवा जे कोणत्याही विभागाच्या किंवा केंद्राच्या कक्षेत येत नाही अशा विषयांतील किंवा क्षेत्रांतील अध्यापन व संशोधन कार्याचे व्यवस्थापन करण्यासाठी समित्या नियुक्त करणे, आणि अशा समित्यांच्या कार्यांवर देखरेख ठेवणे. अशा समित्यांची रचना, अधिकार व कार्ये, विनियमांद्वारे विहित करण्यात येतील;

(३) विद्यापीठ विभागाने किंवा प्रशालेच्या अंतर्गत असलेल्या केंद्राने शिफारस केलेले पाठ्यक्रम किंवा अध्ययनक्रम यांची विद्या परिषदेकडे शिफारस करणे;

(४) विद्यापीठामधील पदव्युत्तरपदवी पाठ्यक्रम किंवा अध्ययनक्रम यांचा विचार करणे आणि त्याची विद्या परिषदेकडे शिफारस करणे;

(५) संशोधन पदव्यांच्या बाबतीत असेल त्या खेरीज, परीक्षकांच्या व नियामकांच्या नावांची विद्या परिषदेकडे शिफारस करणे;

(६) विभागांकडून व केंद्रांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर विचार केल्यानंतर, अध्यापक पदांची निर्मिती करण्याची आणि ती पदे रद्द करण्याची विद्या परिषदेकडे शिफारस करणे;

(घ) शासनाद्वारे त्याच्याकडे निर्दिष्ट करण्यात येतील अशा इतर बाबी,

यांबाबत चौकशी करील आणि अहवाल तयार करील आणि त्याला योग्य वाटतील अशा शिफारशी शासनास करील.

(३) राज्य शासन, अशा प्रत्येक बाबतीत, चौकशी करवून घेण्याचा आपला इरादा असल्याबद्दल विद्यापीठाला नोटीस देईल आणि अशा चौकशीत अभिवेदन करण्याचा विद्यापीठाला हक्क असेल.

(४) राज्य शासन, अशा चौकशीच्या निष्कर्षाच्या संदर्भातील आपली मते, विद्यापीठाला कळवील आणि त्यावरील विद्यापीठाचे मत जाणून घेतल्यानंतर त्यासंबंधात हाती घ्यावयाच्या कारवाईच्या संबंधात विद्यापीठाला सल्ला देईल व अशी कारवाई करण्याची कालमर्यादा निश्चित करील.

(५) विद्यापीठ, अशा प्रकारे निश्चित केलेल्या कालमर्यादेत, राज्य शासनाने त्यास दिलेल्या आदेशाच्या बाबतीत त्याने हाती घेतलेल्या किंवा हाती घेण्याचे योजिलेल्या कारवाईच्या संबंधात राज्य शासनाला कळवील.

(६) जर विद्यापीठाने, पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेत कोणतीही कारवाई केली नाही तर किंवा जर विद्यापीठाने केलेली कारवाई राज्य शासनाच्या मते, समाधानकारक नसेल तर, राज्य शासनास, विद्यापीठाने दिलेले कोणतेही स्पष्टीकरण किंवा केलेले अभिवेदन विचारात घेतल्यानंतर, त्यास योग्य वाटतील असे निदेश देता येतील व विद्यापीठ अशा निदेशांचे पालन करील.

## प्रकरण बारा

## **संक्रमणकालीन तरतुदी.**

विद्यापीठाच्या प्रथम अधिका-यांची नियुक्ती.

**८७.** पहिला कुलगुरू, कुलसचिव, वित्त व लेखा अधिकारी, संचालक, मूल्यनिर्धारण व मूल्यमापन व विद्यापीठाची उद्दिष्टे साध्य केल्याचे सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक असलेले इतर कोणतेही अधिकारी यांची, शासनाकडून एक वर्षाच्या कालावधीकरिता किंवा अधिनियमानुसार विद्यापीठाच्या अधिका-यांची नवीन नियुक्ती करण्यात येईपर्यंत, यांपैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत, नियुक्ती करण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

मराठी भाषा ही, महाराष्ट्र राज्याची राजभाषा आहे. मराठी भाषा, मराठी साहित्य व संस्कृतीच्या संवर्धनासाठी शासनाने, विविध उपाययोजना केलेल्या आहेत. अध्ययनाच्या विविध शाखांचे सखोल आकलन होण्याच्या दृष्टीने, शिक्षणाचे माध्यम म्हणून मराठी भाषेचा शिक्षणातील वापर वाढविणे आवश्यक आहे. राज्यात मराठी भाषा विद्यापीठ स्थापन व्हावे यासाठी लोकप्रतिनिधींकडून, व्यक्तींकडून व विविध संस्थांकडून अनेक वर्षांपासून मागणी केली जात होती. विविध पैलूंचा अभ्यास करण्यासाठी आणि मराठी भाषा विद्यापीठाची स्थापना करण्यासाठी शासनाला शिफारस करण्याकरिता, शासनाने, दिनांक ११-०७-२०२३ च्या शासन निर्णयाद्वारे प्रख्यात शिक्षणतज्ञ, डॉ. सदानंद मोरे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केली होती. प्रस्तावित विद्यापीठाचे स्थान, त्याचे कार्यक्षेत्र, संरचना, घटना, विविध विभाग व प्राधिकरणे, कामकाज, उद्दिष्टे, अधिकार व कार्ये, विद्याशाखा, रोजगाराभिमुख उच्च शैक्षणिक अभ्यास पाठ्यक्रम आणि त्यांचा अभ्यासक्रम, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगामध्ये मराठी भाषेचे संवर्धन व वापर यांसारख्या विविध पैलूंचा व इतर आनुषंगिक बाबींचा अभ्यास करणे ही, उक्त समितीची कार्यकक्षा होती.

**२.** उक्त समितीच्या शिफारशींचा विचार केल्यानंतर, मराठी भाषा, मराठी साहित्य व संस्कृती यांचे जतन व संवर्धन करण्यासाठी, आणि मराठीमध्ये रोजगाराभिमुख उच्च शिक्षणाचा विकास व अभिवृद्धी करण्यासाठी, कृत्रिम बुद्धिमत्तेशी संबंधित असलेल्या उपयोजकांमध्ये मराठी भाषेच्या वापरास प्रोत्साहन देण्यासाठी आणि तत्संबंधित व तदानुषंगिक बाबींकरिता मराठी भाषा विद्यापीठाची स्थापना व विधिसंस्थापन करण्यासाठी नवीन कायदा करणे इष्ट आहे असे महाराष्ट्र शासनास वाटते.

**३.** प्रस्तावित कायद्याची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत, म्हणजे :–

(क) " मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूर, अमरावती " या नावाचे असंलग्न एकात्म विद्यापीठ स्थापन करणे, ते, एक निगम निकाय असेल;

(ख) विद्यापीठाच्या विविध उद्दिष्टांसाठी तरतूद करणे, जसे की, –

(एक) अध्यापनाद्वारे ज्ञान व समज यांचा प्रसार करणे, त्यांची निर्मिती व जतन करणे ;

(दोन) मराठी भाषा व साहित्य यामध्ये, संशोधन व विकास करणे, कौशल्य विकास करणे, प्रशिक्षण व शिक्षण देणे, विस्तार व सेवा पुरविणे ;

(तीन) मराठी भाषा, मराठी साहित्य व संस्कृती यांमध्ये, उच्चस्तरीय संशोधन केंद्र म्हणून काम करणे ;

(चार) राज्यभरातील मराठी भाषेच्या विविध बोलींचा अभ्यास करणे ;

(पाच) भविष्यातील संभाव्य वैज्ञानिक विकास विचारात घेऊन, प्रत्येक क्षेत्रामध्ये, प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक मराठी साहित्यावरील संशोधनाची तरतूद करणे;

(सहा) आधुनिक ज्ञान भाषा व शिक्षणाचे माध्यम म्हणून मराठीचा विकास करणे ;

(सात) वरील उद्दिष्टे आणि केंद्र सरकारचे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण किंवा नियामक प्राधिकरणांनी दिलेले निदेश व केलेले विनियम यांची पूर्तता करण्यासाठी व त्यास चालना देण्यासाठी आवश्यक असतील असे इतर उपक्रम हाती घेणे, इत्यादी ;

(ग) मराठी भाषेची व मराठी साहित्याची जोपासना व संवर्धन करण्याकरिता ज्ञानाच्या अभिवृद्धीसाठी व प्रसारासाठी अध्यापनाच्या विविध शाखांमध्ये आणि त्यांच्या बहुविध-विद्याशाखीय व आंतर-विद्याशाखीय क्षेत्रांमध्ये संशोधन करणे ;

(घ) अध्यापन, अध्ययन, प्रशिक्षण, संशोधन व विकास किंवा विस्तार करण्यासाठी विद्यापीठ प्रशाला, विभाग, केंद्रे, प्रादेशिक केंद्रे किंवा उपकेंद्रे, प्रयोगशाळा, ज्ञान संसाधन केंद्रे, अध्ययन संसाधन केंद्रे, ग्रंथालये, इत्यादींची स्थापन करणे, रचना करणे, त्यांचे व्यवस्थापन करणे ;

(ङ) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती यांचे जतन व संवर्धन करण्यासाठी आंतरराष्ट्रीय केंद्र स्थापन करणे ;

(च) राज्य शासनाने, विद्यापीठ अनुदान आयोगाने आणि इतर नियामक प्राधिकरणांनी, याबाबत वेळोवेळी, दिलेले निदेश, केलेले नियम, विनियम आणि काढलेल्या अधिसूचना यांनुसार, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० याच्याशी अनुरूप असलेल्या विशिष्ट क्षेत्रामध्ये, भारतातील किंवा परदेशातील इतर संस्था किंवा विद्यापीठे यांच्याबरोबर बहु-परिसर अध्यापनास व संशोधनास परवानगी देऊन, संयुक्त पदव्या किंवा दुहेरी पदव्या प्रदान करणे आणि श्रेयांकाचे हस्तांतरण करणे ;

(छ) स्वतंत्र स्वरूपात अथवा इतर राज्य किंवा राष्ट्रीय किंवा जागतिक विद्यापीठांबरोबर संयुक्त स्वरूपात विशिष्ट पदव्या, पदविका किंवा प्रमाणपत्रे देण्यासाठी विविध परीक्षांकरिता पसंतीवर-आधारित श्रेयांक प्रणालीमध्ये, शिक्षण देण्याच्या पारंपरिक, समकालीन व भविष्यकालीन पद्धतीमध्ये, शिक्षणाचे व अभ्यासाचे पाठ्यक्रम विहित करणे ;

(ज) व्यवस्थापन मंडळाच्या, राज्य शासनाच्या व केंद्र सरकारच्या संबंधित परवानगीने, राज्यामध्ये, राज्याच्या बाहेर व परदेशात प्रादेशिक केंद्रे किंवा उपकेंद्रे स्थापन करणे ;

(झ) माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाच्या वापरासह ' सहयोगदायी व सहभागकारक ' अध्ययनाच्या अधिकाराचा वापर करण्यासाठी, इ-अध्ययन व इ-प्रशासन सेवा, या दोन्हींसाठी सर्वसमावेशक डिजिटल विद्यापीठ संरचना निर्माण करणे.

**४.** वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

नागपूर,
दिनांक १४ डिसेंबर, २०२३.

**चंद्रकांत (दादा) पाटील,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेत : –

**खंड १(२).–** या खंडान्वये, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास, हा अधिनियम अंमलात आणण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ७(३). –** या खंडान्वये, विद्यापीठाचे अधिकारी, अध्यापक व इतर कर्मचारीवर्ग यांचे वर्गीकरण, त्यांच्या निवडीची रीत व पद्धती, नियुक्ती, पदस्थापना व प्रगत प्रशिक्षण, क्षेत्र अनुभव, प्रतिनियुक्ती आणि अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती आणि इतर मागासवर्ग, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (इडब्लूएस) यांमधील व्यक्तींसाठी पदे राखून ठेवणे; त्यांची कर्तव्ये, कामाचा भार, वेतन, भत्ते, सेवानिवृत्तीनंतरचे लाभ, इतर लाभ, वर्तणूक व शिस्तभंग विषयक बाबी आणि त्यांच्या सेवेच्या इतर शर्ती यांबाबत तरतूद करणारी प्रमाण संहिता, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड १०(३)(च)(पाच). –** या खंडान्वये, कुलपतीशी विचारविनिमय करून, कुलगुरूच्या नियुक्तीसाठी, अतिरिक्त शैक्षणिक अर्हता व अनुभव, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, विनिर्दिष्ट करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ४६(१). –** या खंडान्वये, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी परिनियम तयार करण्याचा, त्यात सुधारणा करण्याचा किंवा ते निरसित करण्याचा अधिकार, व्यवस्थापन मंडळाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ४८ (१).–** या खंडान्वये, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी आवश्यक असतील असे आदेश तयार करण्याचा, त्यात सुधारणा करण्याचा किंवा ते निरसित करण्याचा अधिकार, व्यवस्थापन मंडळाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ४९ (१).–** या खंडान्वये, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी आवश्यक असतील असे विनियम तयार करण्याचा अधिकार, नियामक मंडळाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ८४.–** या खंडान्वये, या अधिनियमाच्या व परिनियमांच्या तरतुदींस अधीन राहून, विद्यापीठाच्या कोणत्याही अधिका-यास किंवा प्राधिकरणास, परिनियम, आदेश व विनियम करण्याच्या अधिकाराखेरीज, त्यांचे किंवा त्याचे अन्य अधिकार, त्यांच्या किंवा त्याच्या नियंत्रणाखालील इतर कोणत्याही अधिका-यास किंवा प्राधिकरणास आदेशाद्वारे प्रदान करण्याचा अधिकार, विद्यापीठाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ८६.–** या खंडान्वये, या अधिनियमाच्या प्रारंभापासून पाच वर्षे संपल्यावर आणि त्यानंतर, प्रत्येक पाच वर्षे संपल्यावर, आयोग घटित करण्याची आणि उक्त आयोगाने अनुसरण करावयाच्या कार्यपद्धतीची, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, तरतूद करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ८९.–** या खंडान्वये, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, ती अडचण दूर करण्यासाठी **शासकीय राजपत्रामध्ये** प्रसिध्द केलेला आदेश काढण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे वर नमूद केलेले प्रस्ताव, सामान्य स्वरूपाचे आहेत.

**वित्तीय ज्ञापन**

या विधेयकात, महाराष्ट्र राज्यात मराठी भाषा व साहित्य यांची शैक्षणिक स्वायत्तता व उत्कृष्टता, परिवर्तन, सक्षमीकरण व संवर्धन यांकरिता तरतूद करण्यासाठी मराठी भाषा विद्यापीठ म्हणून रिद्धपूर, अमरावती येथे मराठी भाषा विद्यापीठ स्थापन करण्याचे व विधिसंस्थापित करण्याचे प्रस्तावित केले आहे. हे विधेयक, राज्य विधानमंडळाचा अधिनियम म्हणून अधिनियमित झाल्यावर, राज्याच्या एकत्रित निधीतून प्रत्येक वर्षी करावयाच्या अंदाजे रुपये सात कोटी पन्नास लाख इतक्या आवर्ती खर्चाचा आणि रुपये दोनशे पाच कोटी इतक्या अनावर्ती खर्चाचा या विधेयकात अंतर्भाव असेल.

